


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १०८ • पुणे • मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313



वन्यजीवांच्या शिकारीचा धक्कादायक प्रकार 3



तृप्ती देसाई यांच्या राजकीय भूमिकेकडे लक्ष 4

## ठळक बातम्या

### काँग्रेसची उमेदवारांची यादी जाहीर

मुंबई (आरंभ पर्व) : काँग्रेसने मुंबई महापालिकेसाठी आपल्या 87 उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. यात ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात म्हणजे माहिम विधानसभा मतदारसंघातील वॉर्ड क्रमांक 192 मध्ये दीपक भिकाजी वाघमारे यांना उमेदवारी दिली आहे. यामुळे येथील सामना अधिक चुरशीचा होण्याची शक्यात आहे. मुंबई महापालिकेसह राज्यातील 29 महापालिकांसाठी येत्या 15 जानेवारीला निवडणूक होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी निकाल घोषित होणार आहेत. उद्या उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आज आपल्या 87 उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक - 2026 साठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने अधिकृत उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात येत आहे. निवड झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन आणि शुभेच्छा. आपली मुंबई घडवूया, मुंबईच्या हितासाठी काँग्रेसला निवडूया, असे काँग्रेसने ही यादी जाहीर करताना आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### मनसेचा पहिला उमेदवार ठरला

मुंबई (आरंभ पर्व) : महापालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरायला आता काही तास शिल्लक आहेत. त्यात प्रत्येक पक्षात नाराजीनाट्य दिसून येत आहे. अनेक इच्छुक उमेदवार पक्षाकडून तिकीटाची आस लावून बसले आहेत. त्यात बंडखोरी टाळण्यासाठी पक्षांकडून उमेदवार यादी जाहीर करण्याऐवजी उमेदवाराला थेट एबी फॉर्म देत आहेत. यंदाच्या निवडणुकीत पहिल्यांदाच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन्ही बंधू एकत्र आले आहेत. त्यात राज ठाकरे यांच्या मनसेकडून पहिला उमेदवार घोषित झाला आहे.

# किडनी रॅकेटप्रकरणी अहवाल!

## ४७० पानी अहवालात काय, दोषी कोण; लवकरच निर्णय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रुबी हॉल क्लिनिकमधील अवैध किडनी (मूत्रपिंड) रॅकेटबाबत चौकशी करण्यासाठी राज्य शासनामार्फत उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांचे अध्यक्षतेखाली १० सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीने रुबी हॉल क्लिनिकमध्ये घडलेल्या किडनी रॅकेटबाबत सखोल चौकशी करुन ४७० पानांचा चौकशी अहवाल आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे वर्षभरानंतर सादर केला आहे. या अहवालातून या किडनीदाता बनावट पत्नी असल्याचे समोर आले असून, आता दोषी नेमके कोण हेही उघड होणार आहे.

रुबी हॉल क्लिनिकमध्ये झालेल्या किडनी रॅकेटबाबत सविस्तर चौकशी करण्यासाठी शासनाने चौकशी समिती स्थापन करुन या समितीमार्फत दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी पासून




चौकशीचे कामकाज सुरु केलेले होते. अमित अण्णासाहेब साळुंखे हे किडनी स्वीकारणारे असून बनावट पत्नी. सारिका गंगाराम सुतार या किडनीदाता आहेत, असे चौकशी समितीस चौकशीदरम्यान निदर्शनास आलेले आहे. सारिका गंगाराम सुतार यांची बहीण कविता कोळी यांनी किडनी देण्याबाबत ठरलेली रक्कम न मिळाल्याने हेल्पलाईन क्रमांक १०० या क्रमांकावर दूरध्वनी करुन रुग्णालयास त्यांना डिस्चार्ज देण्यास थांबविले.

या दहा सदस्यीय चौकशी समितीचे अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली १० सदस्यीय चौकशी समितीने किडनी रॅकेट प्रकरणाशी निगडित सर्वांची तपासणी तसेच उलट तपासणी यांची तपासणी केली. त्यात (शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर, रुबी हॉल क्लिनिक, कागदपत्रे तयार करणारे कर्मचारी व एजंट, किडनी देणारा किडनीदाता व किडनी घेणारा रुग्ण यांचा समावेश होता. याचबरोबर स्टेट ऑथरायझेशन समिती, ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे व पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा क्र. २ पुणे, प्रथम खबर देणारे श्री. होगाडे, सांगली शिवाय प्रथमतः या चार सदस्यीय चौकशी समितीमधील चौकशी अधिकारी यांची तपासणी व उलट तपासणी करण्यात आली आहे.

या समितीने चौकशी अहवाल आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची २४ डिसेंबरला भेट घेतली. त्यावेळी आरोग्यमंत्र्यांशी. चौकशी समितीचे अध्यक्ष उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे, चौकशी समिती यांच्यासह चौकशी समिती सदस्यांनी सखोल चर्चा करुन ४७० पानांचा चौकशी अहवाल सादर केला.



## मुंबईत सोबत, पण पुण्यात फारकत; भाजपा-शिवसेना स्वतंत्र लढणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान, तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी सुरू आहेत. राजकीय पक्षांमध्ये युती आणि आघाडी होत असून उमेदवारांच्या याद्या जाहीर केल्या जात आहेत. महापालिकांच्या निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे अनेक उमेदवारांची धावपळ आणि नेत्यांच्या बैठका सुरू आहेत.

यातच पुण्यात भाजपा आणि शिंदेंच्या शिवसेनेत मोठ्या घडामोडी सुरू आहेत. पुण्यात भाजपा आणि शिंदे शिवसेनेची युती तुटल्याची माहिती समोर आली आहे. दोन ते तीन दिवसांपासून भाजपा आणि शिंदे शिवसेनेच्या नेत्यांमध्ये बैठकांवर बैठका सुरू होत्या. मात्र, जागावाटपावरून भाजपा आणि शिवसेनेत मतभेद झाल्यामुळे आणि शिंदेंच्या सेनेला समाधानकारक जागा मिळत नसल्यामुळे शिंदेंच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्याचं बोललं जात आहे. या सर्व घडामोडींवर माध्यमांशी बोलताना शिवसेनेचे (शिंदे) नेते नाना भानगिरे यांनी पुण्यात भाजपा आणि सेनेची युती तुटल्याचं जाहीर केलं आहे. तसेच शिवसेना पुण्यात सर्व जागा स्वबळावर लढवणार असल्याचंही भानगिरे यांनी स्पष्ट केलं आहे.

"आमच्या सर्व कार्यकर्त्यांना एबी फॉर्म दिले जाणार आहेत. आम्ही जेवढ्या सर्व जागा आहेत, तेवढ्या सर्व जागा लढणार आहोत. थोड्याच वेळात सर्व जागा लढवण्याचा निर्णय होईल. वेगळं लढवण्याचं ठरलेलं आहे आणि आमच्या सर्व उमेदवारांना एबी फॉर्म मिळतील. ज्या ठिकाणी आमच्या इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केलेले आहेत, त्या सर्वांना एबी फॉर्म दिले जातील", असं नाना भानगिरे यांनी म्हटलं आहे.

भाजपा आणि शिंदे शिवसेनेची युती तुटली आहे का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता नाना भानगिरे यांनी म्हटलं की, "हो, भाजपा आणि शिवसेनेची युती तुटल्यात जमा आहे. आता सर्वांना एबी फॉर्म वाटावे लागतील. आमच्या ७० ते ८० जणांनी अर्ज दाखल केलेले आहेत. आता आणखी काही जण अर्ज दाखल करतील. आता आमची माघार नाही", असं म्हणत नाना भानगिरे यांनी ही युती तुटल्याचं स्पष्ट केलं आहे.

## कल्याणीनगर : मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कल्याणीनगर भागात मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसाय पोलिसांनी उघडकीस आणला. याप्रकरणी येरवडा पोलिसांनी मसाज पार्लर व्यवस्थापकासह दोघांना अटक केली. मोतीबर समसुलहक रेहमान (वय ३१, रा. संजय पार्क, विमाननगर,मूळ रा. आसाम), अब्दुल मोनुउद्दीन आवाल (वय १९, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलीस शिपाई बालाजी सोगे



यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याणीनगर भागातील एका संकुलात मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती येरवडा पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी मसाज सेंटरमधून तरुणींना ताब्यात घेण्यात आले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कात्रज-मंतरवाडी बाह्यवळण मार्ग, तसेच बाणेर भागातील एका लॉजमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा प्रकार पोलिसांनी नुकताच उघडकीस आणला. त्यानंतर कोंढव्यातील एका मसाज सेंटरवर छापा टाकून पोलिसांनी तरुणींची सुटका केली. याप्रकरणी मसाज सेंटरच्या चालकासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मसाज सेंटरच्या नावाखाली सुरू असलेले गैरप्रकाराच्या तक्रारी पोलीस आयुक्तांकडे करण्यात आल्या. त्यानंतर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मसाज सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांवर कारवाईचे आदेश शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना दिले आहेत.

## अपार्टमेंटमधील १६ दुचाकी वाहने जळून खाक

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

लिंगाळी (ता. दौंड) परिसरातील कल्पतरू अपार्टमेंटमधील १६ दुचाक्या जळून खाक झाल्या आहेत. ही घटना मध्यरात्रीच्या सुमारास घडली असून या घटनेमुळे अपार्टमेंटमधील वाहन मालकांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. सदरची वाहने नेमकी कशामुळे जळाली याचा उलगडा अद्याप झाला नसून या घटनेचा पोलीस शोध घेत असल्याची माहिती ठाणे अंमलदार महेंद्र गायकवाड यांनी दिली. याप्रकरणी अपार्टमेंटमधील रहिवासी हनीफ तांबोळी यांनी पोलिसांना तक्रार दिली आहे. दरम्यान या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण



निर्माण झाले आहे. आग शॉर्टसर्किटने लागली की गाड्या पेटवून दिल्या हे मात्र गुलदस्त्यात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदरची घटना दिनांक २९ डिसेंबर मध्यरात्रीच्या सुमारास लिंगाळी हद्दीतील कल्पतरू अपार्टमेंटच्या पार्किंग मध्ये ही घटना घडली. या घटनेत १५ दुचाकी वाहने आणि १ नॅनो कार जळाली आहे. प्रकरणी पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अविनाश गायकवाड करीत आहेत.

## धनुष्यबाणाचे बटन दाबा; स्वर्गात जागा : शहाजीबापू


**सांगोला (दै. आरंभ पर्व)**

सांगोल्याच्या सभेत बोलताना शिवसेना शिंदे गटाचे नेते शहाजीबापू पाटलांनी अजब वक्तव्य केले आहे. शिवसेनेला मतदान करणारे स्वर्गात जाणार असल्याचे विधान त्यांनी केले आहे. ज्यांनी धनुष्यबाणाचे बटन दाबले त्याला स्वर्गातच जागा आहे, असेही शहाजीबापू पाटलांनी म्हटले आहे.

सभेत बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, मी खात्रीने सांगतो, ज्यांनी ज्यांनी धनुष्यबाण दाबला त्यांना त्यांना स्वर्गातच जागा आहे. नरकात तुम्हाला देव घेत नाही. स्वर्गात तुम्ही गेल्याशिवाय राहत नाही. देव तुम्हाला नरकात जाऊच देत नसतो. मात्र, ज्यांनी विरोधकांची बटणं दाबली त्यांचे काय खरे नाही त्यांच्यात रामच उरला नाही, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. तसेच यावेळी बोलताना शहाजीबापू पाटलांनी विधानसभेतल्या पराभवावरून देखील दीपक साळुंखेंवर टीका केली. ते म्हणाले, मी भाकरीत साप पाळला होता म्हणूनच मला विधानसभेला पराभवाचा



फटका बसला, असे ते म्हणाले. तसेच आपण आजही महायुतीत आहे. आपल्याला युतीचेच काम करायचे असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. पुढे शहाजीबापू पाटील म्हणाले, हा मतदारसंघ 2014 पासून शिवसेनेचा आहे. तुम्ही आमचा सन्मान ठेवा आम्ही तुमचा कोणताही शब्द खाली पडू देणार नाही. पण तुम्ही तसे केले नाही, तर आम्ही पुन्हा एकट्या वाटेने जाऊ, असा इशारा त्यांनी यावेळी भाजपला दिला. शिवाय तुम्ही आताच्या निवडणुकीत ऐकले असते तर तुम्ही सत्तेत निम्मे भागीदार झाला असता, असा टोलाही त्यांनी लगावला.माजी आमदार व शहाजीबापू पाटलांचे कट्टर विरोधक समजले जाणारे दीपक साळुंखे यांच्यावरही त्यांनी टीका केली. ते म्हणाले, दीपक साळुंखे स्वतःला किंग मेकर म्हणतात. मी जिथे जाईल त्याचा गुलाल असतो असे ते सांगतात. मात्र, ते पांढऱ्या पायांचे असल्यामुळे ते ज्यांच्याकडे जातील त्यांचा पराभव नक्की, अशी जहरी टीका पाटलांनी केली.

# आजारी ज्येष्ठांची जबाबदारी

हतबल आणि आजारी ज्येष्ठ नागरिक यांच्या संदर्भात एक महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. देशातील न्यायव्यवस्थेबाबत जनतेच्या मनात विश्वास निर्माण करणारा हा संवेदनशील निर्णय असल्याने तो स्पृहणीय आहे.

गेल्या काही दशकांमध्ये विभक्त कुटुंबाची वाढती संख्या आणि घरातील ज्येष्ठांची अडगळ म्हणून होत असलेली संभावना असे विदारक चित्र काही अपवाद वगळता पाहावयास मिळते आहे. वाढत्या वयामुळे येणाऱ्या शारीरिक व्याधी तसेच महागाई व वाढत्या वैद्यकीय खर्चामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक हवालदिल झालेले दिसतात. अनेक जण मुले नोकरी धंद्यानिमित्त परदेशी, परगावी असल्यामुळे वा मुलांनी केलेल्या दुर्लक्षामुळे आयुष्याची संध्याकाळ एकाकी व्यतीत करताना दिसतात. ज्या वयात माणसाला शारीरिक आणि त्यापेक्षा अधिक मानसिक आधाराची गरज असते तेव्हाच ती त्यापासून वंचित होतात. कित्येकदा त्यांच्या जिवंतपणी बळजबरीने, फसवून तर कधी गोड बोलून त्यांची संपत्ती आपल्या नावे करून घेऊन त्यांचा सांभाळ न करणारी माणसेही बघावयास मिळतात. अशी माणसे समाजाला आणि माणुसकीला कलंक असतात.

माणसाच्या आयुर्मानात वाढ झाली आहे. जगभरातील सरासरी आयुर्मान १९०० मध्ये ३२ वर्षे होते. २०२२ मध्ये ते ७२ वर्षांपर्यंत वाढले आहे. भारतातही सरासरी आयुर्मान २०२३ च्या अंदाजानुसार सुमारे ७० ते ७२ वर्षांच्या दरम्यान आह. आरोग्य सुविधांमधील सुधारणा, लसीकरण आणि संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण यामुळे गेल्या काही दशकांत यांत लक्षणीय वाढ झाली आहे. स्वातंत्र्याच्या वेळी सरासरी आयुर्मान केवळ ३१-३२ वर्षे होते, त्यात आता दुपटीहून अधिक वाढ झाली आहे, मात्र यातून काही सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत.

वाढत चाललेले वय, त्यामुळे वेगाने कमी होत जाणारी उमेद आणि पैसा, वेळ आणि श्रम, खर्ची पाडणारी किचकट कायदेशीर प्रक्रिया यामुळे हे ज्येष्ठ नागरिक हतबलतेने जीवन व्यतीत करताना दिसतात. पण सरकार याबाबत जागरूक असून ते या ज्येष्ठ नागरिकांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारे कल्याणकारी कायदे करत आहे व न्यायालयेही न्यायिक प्रगल्भता, सतर्कता व विवेक दाखवत या कायद्यातील तरतुदींचा व्यापक अर्थ लावत अशा हतबल ज्येष्ठांना न्याय मिळवून देत आहेत. याचे स्वागतार्ह व दिलासादायक उदाहरण मुंबई उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाने नुकतेच पाहायला मिळाले आहे.



बांद्रा होली फॅमिली हॉस्पिटल विरुद्ध महाराष्ट्र राज्य, सीनियर सिटीझन ट्रायब्युनल व अमित पुरी या फौजदारी रिट याचिकेत न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. अमित पुरी यांनी आपल्या आईला (मोहिनी पुरी, वय वर्षे ७६) संबंधित हॉस्पिटलमध्ये ऑगस्ट २०२५ मध्ये उपचारांसाठी दाखल केले होते. हॉस्पिटलचे सुमारे सोळा लाखांचे बिल झाले होते. डॉक्टरांनी मोहिनी यांची तब्येत आता स्थिर असून त्यांना घरी घेऊन जाण्यास अमित यांना ऑक्टोबर महिन्यात सांगितले. अमित पुरी राहत असलेली बांद्रा येथील सदनिका मोहिनी यांच्या नावावर आहे. परंतु, अमित यांनी त्यांना घरी घेऊन जाण्यासाठी टाळाटाळ सुरू केली व पैसे भरण्याचीही तयारी दाखवली नाही. या काळात मोहिनी यांची देखभाल हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी केली. मला दुसऱ्या डॉक्टरांचे मत घ्यायचे आहे, त्यासाठी मला रुग्णाचे सर्व मूळ (ओरिजिनल) कागद देण्यात यावेत, अशी अमित यांनी विनंती केली. एवढेच नव्हे तर हॉस्पिटलवर निष्काळजीपणाचा आरोप करत पैसे भरण्यास व आईला घरी नेण्यास नकार दिला. हॉस्पिटलने कागदांच्या प्रती (कॉपी) देण्याची तयारी दाखवली, पण त्यास अमित यांनी नकार दिला. मूळ कागद सर्व पैसे भरल्यावर व आईला घरी नेताना देऊ, असे हॉस्पिटलने सांगितले. या साऱ्याला कंटाळून हॉस्पिटलने पोलिसांत तक्रार दाखल केली, पण पोलिसांनी काही फारसा प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अखेर हॉस्पिटलने उदार मदतनीस (गुड सॅमरिटन) व हंगामी पालक म्हणून मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने राज्याच्या ॲडव्होकेट जनरलना सरकारची भूमिका मांडण्यासाठी पाचारण केले. सुनावणीच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर न्यायालयातील सुनावणी वकिलांवर सोपवून न्यायालयातून निघून जाण्याचा उद्दामपणाही अमित यांनी दाखवल्याचे निकालात नमूद केले आहे.

या प्रकरणामुळे न्यायालयाच्या सद्सद्विवेक बुद्धीला धक्का बसला आहे व एक मुलगा आपल्या आजारी आणि असहाय्य आईला वाऱ्यावर सोडत आहे व बेजाबदार व बेमुर्वतखोरपणे वागत आहे, हे पाहून न्यायालय भावुक झाले आहे. महाराष्ट्र राज्याचे पोलिस अधिकारी व जेष्ठ नागरिक न्यायधिकरण यांनी आपले कर्तव्य बजावण्यात कुचराई केल्याचे दिसत आहे, असे कठोर निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले आहे. न्यायालयाने या निकालात असेही म्हटले आहे की माता-पिता व वरिष्ठ नागरिक भरण-पोषण व कल्याण अधिनियम, २००७ च्या उद्दिष्टांनुसार ज्येष्ठ नागरिकांना जेव्हा त्यांच्या नजीकच्या नातेवाइकांकडून वाऱ्यावर सोडले जाईल तेव्हा त्यांच्या मालमत्तेचे रक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. हे करत असताना त्या नागरिकाच्या जगण्याच्या आणि आरोग्याच्या घटनादत्त अधिकाराची अंमलबजावणी होईल, हे बघणे हे सरकारचे काम आहे. कायद्याच्या या अर्थबोधनाने हे हक्क स्वतंत्रपणे राबविण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांचे सबलीकरण होईल, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

'माता-पिता व वरिष्ठ नागरिक भरण-पोषण व कल्याण अधिनियम, २००७' व 'दिव्यांगजन अधिकार अधिनियम, २०१६' या सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या व कल्याणकारी कायद्यांचा अर्थ लवचीकपणे, व्यापक व कायद्याचे जे उद्दिष्ट आहे ते साध्य होईल, या दृष्टीने लावावयास हवा, असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाच्या या संदर्भातील निकालांच्या तथ्यांचा आधार घेत व प्रकरणातील सर्व तथ्ये लक्षात घेता श्रीमती गिरी यांच्या घटनेतील कलम २१ नुसार त्यांना असलेल्या जगण्याच्या आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या हक्कांचा भंग झाला आहे, असे म्हणत न्यायालयाने अमित ह्यांनी आपल्या आईला वाऱ्यावर सोडले आहे, दिव्यांग व्यक्तींना न्यायिक अर्धन्यायिक आस्थापनांकडे जाण्याचा आपला अधिकार बजावण्यासाठी सरकारने सहाय्य करावयास हवे, मुलाने आईला भाभा इस्पितळाच्या अतिदक्षता विभागात हलवावे, भाभा इस्पितळाच्या नियमांप्रमाणे कमकुवत घटक व धर्मादाय रुग्णांसाठी जे दर असतील त्या दराने खर्चाचा भार मुलाने उचलावा, मुलाने या आदेशांचे पालन केले नाही तर सरकारने आईला भाभा इस्पितळात हलवावे, त्यांना सर्व उपचार मिळतील याची काळजी सरकारने सरकारच्या खर्चाने घ्यावी, आईच्या मालमत्तेचे संरक्षण पोलिसांनी करावे, श्रीमती गिरी सध्या राहात असलेल्या बांद्रा येथील निवासस्थान व त्यांच्या अन्य मालमत्तेबाबत न्यायालयाच्या परवानगीशिवाय मुलगा काहीही कारवाई करणार नाही, श्रीमती गिरी यांच्या सर्व मालमत्तांबाबत (ज्यात अमित वापर करत असलेल्या मालमत्तांचाही समावेश असेल) एक प्रतिज्ञापत्र न्यायालयास सादर करावे व याचिकाकर्ता हॉस्पिटल आपल्या थकीत बिलासाठी कायद्यानुसार कारवाई करू शकेल असे आदेश दिले.

समाजाच्या सर्वच क्षेत्रांत आज बेदरकार वृत्ती फोफावताना दिसत असताना न्यायालयाने दाखवलेली ही सक्रियता निश्चितच प्रशंसनीय आहे. लोकांचा न्याय पालिकेवरील विश्वास दृढ करणारी आहे. देशातील न्यायालये ही केवळ विवादाचे निराकरण करत नाहीत तर कायद्याचे यथायोग्य अर्थबोधन करत व आपल्या आधिकारांचा लोक कल्याणासाठी उपयोग करत वंचितांना, असहाय नागरिकांना न्याय मिळवून देत आहेत व बेजबाबदार व्यक्तींना वठणीवर आणत आहेत, असा विश्वास जनतेच्या मनात निर्माण करणारा हा निर्णय आहे आणि म्हणूनच तो स्पृहणीय आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### संघटकपदी नितीन कांबळे यांची नियुक्ती

**खडकवासला(आरंभ पर्व) : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) कामगार आघाडीच्या पश्चिम महाराष्ट्र संघटक तथा प्रमुखपदी नितीन जयराम कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती दि. १६ डिसेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीसाठी करण्यात आली असल्याचे नियुक्तीपत्राद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. कामगार वर्गाच्या प्रश्नांसाठी संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याच्या उद्देशाने ही नियुक्ती करण्यात आली असून, नितीन कांबळे यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) कामगार आघाडीचे पदाधिकारी गा. गुणवंत नागटीले व मा. अनिल मोरे यांनी नितीन कांबळे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आगामी काळात कामगारांचे प्रश्न, हक्क व न्यायासाठी अधिक प्रभावीपणे काम केले जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.**

### कायद्याच्या कोर्टानंतर क्रिकेटच्या मैदानावरही विजयाची छाप




**पुणे (आरंभ पर्व) : पुणे बार असोसिएशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय वकिल महिला राजमाता जिजाऊ क्रिकेट चषक स्पर्धा २०२५ मध्ये राज्यातील विविध जिल्ह्यांतील महिला वकिल संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत 'लिगल ईगल पुणे' संघाने दमदार आणि शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन करत उपविजेतेपद पटकावले. स्पर्धेदरम्यान महिला वकिलांनी केवळ कायद्याच्या क्षेत्रातच नव्हे, तर क्रीडाक्षेत्रातही आपली क्षमता सिद्ध केली.**

# प्रभाग ३४ साठी भाजप तर्फे हरिदास कृष्णा चरवड यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ३४ मधून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार म्हणून हरिदास कृष्णा चरवड यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या उमेदवारीबाबत गेल्या काही दिवसांपासून विविध तर्कवितर्क सुरू होते. मात्र उमेदवारी अधिकृत होताच कार्यकर्ते व समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना हरिदास चरवड यांनी सांगितले की, "संयम आणि संघर्षातून मिळालेले यश अधिक जबाबदारीची जाणीव करून देते. पक्षाने माझ्यावर दाखवलेला विश्वास मी प्रभागाच्या विकासातून सार्थ ठरवीन." आगामी काळात संपूर्ण पॅनल निवडून आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. प्रभाग क्रमांक ३४ मध्ये समाविष्ट असलेल्या गावांचा आणि परिसराचा समतोल विकास साधण्यासाठी ठोस विकासात्मक धोरणे राबवली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक आणि मूलभूत नागरी सुविधा या मुद्द्यांना प्राधान्य देऊन नियोजनबद्ध कामे केली जातील, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी वडगाव येथील त्यांच्या निवासस्थानापासून भव्य दिवे रॅली काढण्यात आली. रॅली वाजत-गाजत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय येथे पोहोचली.

यावेळी "हरिभाऊ तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभाग क्रमांक ३४ मधील निवडणूक आता अधिक चुरशीची होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## भावूक झाले हरिभाऊ!

**पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपकडून मोठ्या संख्येने इच्छुकांची संख्या अधिक होती. यामुळे पक्षांतर्गत तीव्र स्पर्धा झाली होती.. मात्र तरीही पक्षश्रेष्ठींनी हरिदास चरवड यांच्यावर विश्वास दाखवल्यामुळे हरिदास चरवड माध्यमांशी प्रतिक्रिया व्यक्त करताना भावुक झाले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री माधुरीताई मिसाळ चंद्रकांत दादा पाटील,आमदार भीमराव तापकीर, शहराध्यक्ष धीरज घाटे व इतर सर्व नेत्यांचे त्यांनी आभार मानले. माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेल अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.**

## ४८ तासांत सराईत गुन्हेगारांची टोळी जेरबंद; ५६ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत

# खानापूरमधील दिवसा सशस्त्र दरोडा उघड

**खानापूर (दै. आरंभ पर्व)**

खानापूर (ता. हवेली) येथील वैष्णवी ज्वेलर्स या सराफ दुकानावर भरदिवसा सशस्त्र दरोडा टाकणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला पुणे ग्रामीण पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत जेरबंद केले आहे. या कारवाईत ५६ तोळे २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, किंमत सुमारे ७० लाख ३२ हजार रुपये, तसेच दरोड्यात वापरलेला कोयता हस्तगत करण्यात आला आहे.

दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास पाच अनोळखी दरोडेखोरांनी तलवार व कोयत्यासारखी घातक हत्यारे घेऊन वैष्णवी ज्वेलर्स दुकानावर धाड टाकली. दुकानमालक व महिला कर्मचाऱ्यांना शस्त्राचा धाक दाखवून सुमारे ८४ तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम, असा एकूण सुमारे १ कोटी ५ लाख रुपयांचा मुद्देमाल लुटून आरोपी पसार झाले होते. याप्रकरणी दुकानमालकाच्या पत्नी सौ. राणी अमोल बाबर (वय २८) यांनी हवेली पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती.

या घटनेमुळे खानापूर परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल व अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाला गती दिली. स्थानिक गुन्हे शाखा, हवेली व वेल्हे पोलिस ठाण्यांची एकूण सहा तपास पथके तयार करून आरोपींच्या शोधासाठी व्यापक मोहीम राबविण्यात आली.

साक्षीदारांनी दिलेल्या माहितीनुसार दरोडेखोर पानशेत मार्गे पसार झाल्याने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे मोटारसायकलचा माग काढण्यात आला. सलग दोन दिवस दिवस-रात्र तपास केल्यानंतर आरोपी वेल्हे तालुक्यातील सिंगापूर डोंगर परिसरातील जंगलात लपल्याचे निष्पन्न झाले.

गोपनीय माहितीच्या आधारे दि. २८ डिसेंबर रोजी अंकुश दगडू कचरे (वय २०) व गणेश भांबु कचरे (वय २३) यांना जंगलातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत या दरोड्यात तीन विधीसंघर्षित बालकांचा सहभाग असल्याचेही निष्पन्न झाले आहे.




आरोपींकडून दरोड्यात वापरलेला कोयता व ५६ तोळे २ ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता, त्यांना ५ जानेवारी २०२६ पर्यंत पोलिस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. मुख्य आरोपी अंकुश कचरे याच्यावर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे तीन गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# उमेदवारी तिकीटांसाठी जोर बैठका

## बंडखोरी नक्की ; पक्षनिष्ठा आणि पक्षासोबत राहिलेली इतकी वर्षे – पक्षाला विसर पडला आहे का?

### शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

**(दै. आरंभ पर्व)**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे वाहू लागले की राजकारणात एक वेगळाच गोंधळ सुरू होतो. उमेदवारी तिकीटांसाठी जोरदार बैठका, दिल्ली–मुंबई–पुणे दौरे, वरिष्ठ नेत्यांच्या बंगल्यांवरील गर्दी, आणि त्याचबरोबर "तिकीट नाही मिळालं तर बंडखोरी" अशा थेट इशाऱ्यांची भाषा – हे चित्र आता नवीन राहिलेलं नाही.

**मात्र या सगळ्या राजकीय खेळात एक प्रश्न सातत्याने दुर्लक्षित राहतो –**

पक्षासाठी आयुष्य घालवलेली निष्ठा आज कोणाच्या कामाची उरली आहे का?

**पक्ष मोठा की कार्यकर्ता विसरला?**

वर्षानुवर्षे झेंडे उचलणारे, रस्त्यावर उतरून आंदोलनं करणारे, पक्षाच्या वाईट काळातही सोबत राहिलेले कार्यकर्ते आज उमेदवारीच्या यादीत मागे पडताना दिसतात. त्याचवेळी कालपरवाच पक्षात आलेले 'आयात नेते' थेट उमेदवारीच्या अग्रक्रमावर असतात.

**यामुळे साहजिकच प्रश्न निर्माण होतो –**

पक्षाला निष्ठावंतांची गरज फक्त पोस्टर लावण्यासाठीच होती का?

बंडखोरी ही अहंकाराची की वेदनेची प्रतिक्रिया?

बंडखोरीकडे पाहताना सत्ताधारी आणि पक्षनेतृत्व अनेकदा ती शिस्तभंग म्हणून मोकळेपणाने झटकून टाकते. पण बंडखोरी नेहमीच अहंकारातून होते असे नाही. अनेकदा ती वर्षानुवर्षांच्या दुर्लक्षातून, अपमानातून आणि अन्यायातून जन्माला येते.




**जेव्हा एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणतो –** "माझ्या जागेवर बाहेरून आलेल्याला तिकीट दिलं" तेव्हा तो फक्त उमेदवारी गमावल्याची तक्रार करत नसतो, तर तो पक्षाच्या मूल्यांवर प्रश्न उपस्थित करत असतो.

**पक्षनिष्ठा म्हणजे आंधळेपणा नव्हे :** पक्षनिष्ठा म्हणजे प्रत्येक निर्णयाला मान डोलावणं नव्हे. पक्षनिष्ठा म्हणजे पक्षाच्या विचारांवर विश्वास ठेवणं, अन्यायाविरोधात पक्षांतर्गत आवाज उठवणं आणि योग्य न्याय मिळावा यासाठी ठाम राहणं.

मात्र आज पक्षनिष्ठेला कमजोरी समजले जात आहे आणि संधीसाधूपणाला राजकीय कौशल्य म्हणून गौरवले जात आहे.

**पक्ष विसरला की बदलला?**

खरा प्रश्न हा आहे की पक्ष विसरला आहे की काळ बदलला आहे? जर पक्ष केवळ जिंकण्याच्या गणितावर चालणार असेल, तर कार्यकर्त्यांचा विश्वास टिकवणे कठीण होईल. निवडणूक जिंकता येईल, पण संघटना आतून पोखरली जाईल. आणि एकदा का कार्यकर्त्यांचा आत्मसन्मान दुखावला, की ती जखम भरून काढणं सोपं नसतं. तिकीट मिळालं नाही म्हणून बंडखोरी चुकीची असू शकते, पण निष्ठेला सातत्याने डावलणं हे त्याहून मोठं राजकीय अपयश नाही का? पक्षाला जर दीर्घकाळ टिकायचं असेल, तर आयारामांपेक्षा निष्ठावंतांना महत्व देण्याची वेळ आली आहे. नाहीतर आज उमेदवारीसाठी होणाऱ्या बैठका, उद्या पक्षाच्या अस्तित्वासाठी घ्याव्या लागतील.

## ग्रामपंचायत, लिंगाळी ता, दौंड, जि, पुणे

**B1 पेपर नोटीस 1 सन २०२५ /२०२६**

**ग्रामपंचायत लिंगाळी, ता, दौंड, जि, पुणे यांच्याकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा) पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत लिंगाळी, ता, दौंड, जि, पुणे ३० /१२/२०२५ ते दिनांक ०१ /०१/२०२६ कलावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायतमध्ये स्विकारली जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी दिनांक | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | लिंगाळी अंतर्गत जगदाळेवस्ती रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ३०००००/- | ३०/१२/२०२५ ते ०१/०१/२०२६ | १००/- | सुट सु.बे.अ. |
| २ | लिंगाळी जगदाळेवस्ती बंदिस्त गटर करणे. | १००००००/- | ३०/१२/२०२५ ते ०१/०१/२०२६ | १००/- | सुट सु.बे.अ. |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

१) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील.
३) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत.
४) इसारा रक्कम ग्रामपंचायत नावे धनादेश/डी. डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.
५) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.
६) आपण तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणताही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारनेचा सर्व अधिकारी ग्रामपंचायत लिंगाळी यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत, लिंगाळी ता, दौंड, जि, पुणे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत, लिंगाळी ता, दौंड, जि, पुणे**




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५






# वन्यजीवांच्या शिकारीचा धक्कादायक प्रकार

## दुर्मीळ चौसिंगा हरणाची बंदुकीने शिकार; चौघे रंगेहाथ अटकेत



**वेल्हे (दै. आरंभ पर्व)**

राजगड तालुक्यातील पानशेत व पश्चिम हवेलीतील सिंहगड परिसरात वन्यप्राण्यांच्या शिकारीचा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. पानशेत रस्त्यावरील ओसाडे (ता. राजगड) येथे दुर्मीळ चौसिंगा हरणाला बंदुकीने गोळ्या घालून ठार मारणाऱ्या चौघा शिकाऱ्यांना राजगड तालुका वन विभागाने रंगेहाथ अटक केली आहे.

नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असलेल्या संवेदनशील वनक्षेत्रात शिकारीचा प्रकार घडल्याने वन विभाग सतर्क झाला आहे. रविवारी (दि. २८) दुपारी सुमारे चारच्या सुमारास वनरक्षक राजेंद्र निबोरे हे गस्तीवर असताना हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. आरोपी शिकार केलेल्या चौसिंगा हरणाच्या मांसाची वाटणी करत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी समीर वसंत पिलाणे (३६), गणेश बबनराव लोहकरे (३८, दोघे रा. ओसाडे, ता. राजगड), नवनाथ चंद्रकांत पावले (४०, रा. सोनापूर, ता. हवेली) व पांडुरंग दत्तात्रय कदम (४७, रा. निगडे मोसे, ता. राजगड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींकडून शिकारीसाठी वापरलेली बंदूक व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.

या प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, हा गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र आहे. दोषी आढळल्यास सात वर्षांपर्यंत कारावास व २५ हजार रुपये दंडाची तरतूद आहे. पुढील तपास राजगड तालुका वन परिक्षेत्र अधिकारी अनिल लांडगे करीत आहेत.

वन्यप्राण्यांच्या शिकारीला आळा घालण्यासाठी पानशेत–सिंहगड परिसरात गस्त वाढवण्यात आली असून, विशेष पथके व गुप्तहेर यंत्रणा सक्रिय करण्यात आली असल्याची माहिती वन विभागाने दिली.




## इलेक्ट्रॉनिका इंडिया आणि प्रोडक्ट्रोनिका इंडियाने शुभारंभ केला



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उत्तर प्रदेश हे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचे एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास आले आहे. उत्तर प्रदेश सरकारचे माननीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री श्री सुशील कुमार शर्मा यांनी मेस्से म्युंचेन इंडियाने आयोजित केलेल्या देशव्यापी उद्योग आणि खरेदीदार पोहोच मोहिमेला हिरवा झेंडा दाखवला. या मोहिमेचा उद्देश भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून राज्याचे स्थान मजबूत करणे आहे. ही यात्रा इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, पुरवठा साखळी आणि प्रादेशिक उद्योग सहभाग मजबूत करणे, प्रगतीशील धोरणे, मजबूत पायाभूत सुविधांद्वारे उद्योगाला पाठिंबा देणे आणि राज्यातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्लस्टर्स आणि केंद्रित प्रयत्नांद्वारे संपूर्ण मूल्य साखळीत गुंतवणूक आकर्षित करणे या राज्य सरकारच्या वचनबद्धतेचे प्रदर्शन करते.

## मोठ्या रॅलीत सायली वांजळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी माजी नगरसेविका सायली वांजळे यांनी आपला उमेदवारी अर्ज मोठ्या रॅलीच्या माध्यमातून आणि जल्लोषात दाखल केला.

काढण्यात आलेल्या या रॅलीत भाजपचे कार्यकर्ते, समर्थक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. घोषणाबाजी, ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साही वातावरणात ही रॅली वारजे क्षेत्रीय कार्यालयात पोहोचली.

सायली वांजळे या पुणे महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका असून त्या सोनेरी आमदार रमेश भाऊ वांजळे यांच्या कन्या आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांच्या कुटुंबातील सर्व




सदस्य उपस्थित होते. कुटुंबीयांचा पाठिंबा आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता परिसरात उत्स्फूर्त वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी बोलताना सायली वांजळे म्हणाल्या की, भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली राज्यात सुरू असलेला विकासाचा वेग सर्वांनाच दिसून येत आहे. "राज्याचा ज्या धर्तीवर विकास सुरू आहे, त्याच धर्तीवर माझ्या प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करेन," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. प्रभागातील नागरिकांसाठी आतापर्यंत केलेले काम, नगरसेविका म्हणून मिळालेला अनुभव आणि कुटुंबाचा सामाजिक वारसा याच्या बळावर आपण पुन्हा एकदा जनतेच्या विश्वासाला पात्र ठरू, असा आत्मविश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर परिसरात आनंदोत्सवाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### आयडीएफसी फर्स्ट बँकेकडून धातूची उत्कृष्ट कलाकृती लॉँच



**पुणे(आरंभ पर्व) :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने गज: (संस्कृतमध्ये गज:) क्रेडिट कार्ड लॉँच करण्याची घोषणा केली आहे. हे बँकेच्या ओळखीच्या उच्च-निव्वळ संपत्ती असलेल्या व्यक्तींसाठी (एचएनआय) डिझाइन केलेले प्रीमियम, केवळ आमंत्रणासाठी उपलब्ध असलेले धातूचे क्रेडिट कार्ड आहे. गज: क्रेडिट कार्ड हे अश्व-मयूर-गज: ट्रायलॉजीचा सर्वात मोठा भाग आहे, बँकेच्या प्रीमियम मेटल क्रेडिट कार्डच्या निवडक मालिकेत. संस्कृतमध्ये, गज: हत्ती हा वैभव, शहाणपण, स्थिरता आणि सर्वोच्च शक्ती दर्शवितो. प्राचीन भारतीय विचारसरणीत, हत्ती हा भूमीच्या वैभवाचा वाहक, साम्राज्यांचा रक्षक आणि मोजलेल्या शक्तीचे प्रतीक होता; कधीही उतावीळ, कधीही अतिरेकी नाही. राजाची महानता बहुतेकदा त्याने घातलेल्या मुकुटाने नव्हे तर तो ज्या हत्तीवर स्वार झाला त्या हत्तीने मोजली जात असे. द गज: क्रेडिट कार्डअत्यंत सुंदर आहे. "धातूमध्ये बनवलेले", हे सिग्नेचर द्विन-हत्तीचे आकृतिबंध हे जागतिक स्तरावर भारतीय ललित कलाकृतीचे मूक राजदूत म्हणून डिझाइन केलेले कारागिरीचे एक उत्कृष्ट नमुना आहे. गज क्रेडिट कार्ड ही निवडक आयडीएफसी फर्स्ट बँक प्रायव्हेट बँकिंग ग्राहकांसाठी आहे ज्यांच्याशी तुमचे मजबूत नाते आहे. कार्डची जॉइनिंग आणि वार्षिक फी ₹१२,५०० + जीएसटी आहे. कार्डमध्ये ₹१ आरपी = रु.१ किमतीचे १२,५०० इन्व्हिटेशन रिवॉर्ड पॉइंट्स आहेत, जे आयडीएफसी फर्स्ट बँक ॲपद्वारे प्रवास बुकिंगवर रिडीम केले जाऊ शकतात, ज्यामुळे जॉइनिंग फी ऑफसेट होते. ₹१० लाखांच्या वार्षिक खर्चावर वार्षिक फी देखील माफ केली जाते. शिवाय, गज एक आकर्षक मेटल कार्ड डिझाइन, शून्य परकीय चलन मार्क-अप, एक साधी १:१ रिवॉर्ड स्ट्रक्चर आणि आधीच मजबूत ऑफर वाढविण्यासाठी डिझाइन केलेले प्रीमियम ट्रॅव्हल आणि लाइफस्टाइल विशेषाधिकारांचा संच देते.

### ज्वेलरी ब्रँडच्या नेतृत्वाखालील मॅरेथॉनची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदणी



**पुणे(आरंभ पर्व) :** किसाना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरी (हरि कृष्णा ग्रुप) ने किसाना डायमंड मॅरेथॉनच्या ऐतिहासिक १ व्या आवृत्तीचे यशस्वीरित्या आयोजन केले. मॅरेथॉन पुणे मधे १ आवृत्तीत पोहोचली असताना, भारतातील इतर ५६ शहरांमध्ये ज्वेलरी ब्रँडने मॅरेथॉन आयोजित करण्याची ही पहिलीच वेळ होती, ज्यामुळे हा उपक्रम राष्ट्रीय स्तरावर एक ऐतिहासिक कामगिरी ठरला. "स्वच्छ भारत, निरोगी भारत" या थीम अंतर्गत देशभरातील ५७ शहरांमध्ये एकाच वेळी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता आणि अधिकृतपणे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रयत्न म्हणून त्याची नोंदणी करण्यात आली होती. मुंबईत ५,००० हून अधिक सहभागींसह देशभरातून २०,००० हून अधिक धावपटूंनी या कार्यक्रमासाठी नोंदणी केली. ५ किमी, १० किमी आणि २१ किमी शर्यती मुंबईत आयोजित करण्यात आल्या होत्या.

## भुसारी कॉलनीमधून दिलीप वेडे पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीकडून माजी नगरसेवक दिलीप वेडे पाटील यांनी प्रभाग क्रमांक १० (ड) बावधन – भुसारी कॉलनी मधून आपला उमेदवारी अर्ज अधिकृतपणे दाखल केला. कोथरूड येथील क्षेत्रीय कार्यालयात आज हा अर्ज उत्साहपूर्ण वातावरणात दाखल करण्यात आला.



अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना दिलीप वेडे पाटील यांनी सांगितले की, मागील कार्यकाळात प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता, उद्याने तसेच मूलभूत नागरी सुविधांच्या विकासासाठी सातत्याने काम करण्यात आले आहे. या विकासकामांच्या बळावर आणि नागरिकांच्या विश्वासाच्या जोरावर आपण पुन्हा मोठ्या मताधिक्याने विजयी होऊ, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांमध्ये भारत मारणे, बाळासाहेब जेधे, अशोक मारणे, भूषण वेडे पाटील आणि शैलेश वेडे पाटील यांचा समावेश होता. अर्ज दाखल होताच उपस्थित कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत जल्लोष केला. भारतीय जनता पार्टीच्या विकासाभिमुख धोरणांवर विश्वास व्यक्त करत प्रभाग क्रमांक १० (ड) मधील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे दिलीप वेडे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यांच्या उमेदवारीमुळे बावधन–भुसारी कॉलनी परिसरातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.




### रुपेश घुले पाटील यांचा कार्यकर्त्यांसह राजीनामा : आज उमेदवारी अर्ज दाखल होणार

# प्रभाग क्रमांक ३३ मध्ये भाजपला मोठा धक्का

- संयम ठेवला, पक्ष वाढविला माझी चूक झाली का?: रुपेश घुले पाटील
- नांदेडकरांना डावलल्याने भाजपवर नागरिक संतप्त
- घुलेंच्या निर्णयाच्या पाठीशी राहणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला परिसरातील प्रभाग क्रमांक 33 मध्ये राजकीय घडामोडींनी वेग घेतला असून भारतीय जनता पार्टीला मोठा धक्का बसला आहे. खडकवासला भाजपा मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी आपल्या पदाचा तसेच भारतीय जनता पार्टी सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या या निर्णयासोबत अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनीही भाजपपासून फारकत घेतल्याने स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे.



रुपेश घुले पाटील यांच्यासह रश्मी ताई घुले, हेमेंद्र जोशी, महेश बजाज यांनी भाजपाचा राजीनामा दिला आहे. नांदेड सिटी चौकात नांदेडकरांनी निदर्शने केली. यावेळी माजी उपसरपंच किरण हगवणे, जितेंद्र धुमाळ, राजाराम दुपारगुडे, तुषार दादा कारले, अजित वाल्हेकर, प्रल्हाद पाटील, नीलकंठ दादा देडगे आदी कार्यकर्त् उपस्थित होते. या घडामोडीमुळे खडकवासला व नांदेड गाव परिसरातील भाजपच्या संघटनात्मक ताकदीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राजीनाम्यानंतर प्रतिक्रिया देताना रुपेश घुले पाटील यांनी भावनिक शब्दांत पक्षश्रेष्ठींना थेट सवाल केला. "संयम ठेवला, पक्ष वाढविला, बूथपासून मंडलपर्यंत संघटन मजबूत केलं... मग सांगा आमचं काय चुकलं?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अनेक वर्षे निष्ठेने काम करूनही उमेदवारी प्रक्रियेत डावलण्यात आल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

"नांदेड गावचा नगरसेवक व्हायला हवा, ही नागरिकांची ठाम मागणी होती. ती पक्षाच्या वरिष्ठांपर्यंत पोहोचवली; मात्र त्याची दखल घेतली गेली नाही," असा आरोपही त्यांनी केला. सातत्याने संयम ठेवूनही अपेक्षित न्याय न मिळाल्याने स्वाभिमानासाठी हा निर्णय घ्यावा लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाणार असून आज सकाळी अकरा वाजता प्रभाग क्रमांक 33 साठी उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या वेळी मोठ्या संख्येने समर्थक उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

या सर्व घडामोडींमुळे आगामी महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक 33 हे केंद्रबिंदू ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यावेळी बोलताना खडकवासला भाजपा चे सरचिटणीस हे हेमेंद्र जोशी यांनी भाजपाच्या नेत्यावर टीका केली.. रुपेश घुले यांनी भारतीय जनता पार्टी साठी अफाट संघर्ष केला आहे. त्यांना महानगरपालिकेची निवडणूक ही संधी द्यायला पाहिजे होती.

त्यांनी ज्यांच्यासाठी जीवाचं रान केलं त्या व्यक्तींनी त्यांना डावलने हे चुकीचे आहे. आम्ही सर्व नांदेडकरांनी भारतीय जनता पार्टीच्या विरोधात रुपेश घुले सांगतील ते त्या म्हणण्याप्रमाणे काम करणार आहोत..

आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये रुपेश घुले हे त्यांची ताकद दाखवून देतील असा विश्वास व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे




### विटभट्टी कामगारांना कपडे वाटप

राजगुरुनगर : किरण खुडे (आरंभ पर्व) : कडुस (ता. खेड) येथील मुक्ताईमाळ परिसरातील विटभट्टी व ऊसतोड कामगारांना माऊली सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने मोफत कपड्यांचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. राजगुरूनगर परिसरातील नागरिकांकडून लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंतचे जुने, परंतु वापरण्यायोग्य कपडे माऊली सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून संकलित करण्यात येतात. संकलित कपड्यांची योग्य प्रकारे छाननी व विभागणी करून ज्या ठिकाणी गरज आहे, त्या ठिकाणी हे कपडे वाटप केले जातात. या सामाजिक उपक्रमामुळे अनेक गरजू कुटुंबांना दिलासा मिळत आहे. गेल्या एक महिन्यात प्रतिष्ठानकडे जमा झालेल्या तब्बल २६ पोती कपड्यांचे वाटप खेड तालुक्यातील कडुस जवळील विटभट्टी व ऊसतोड कामगारांना करण्यात आले. थंडी व कामाच्या कठीण परिस्थितीत हे उबदार कपडे कामगारांसाठी उपयोगी ठरणार आहेत. कपडे मिळाल्यानंतर कामगार व त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसत होता. "कोणीतरी आमची काळजी घेत आहे" ही भावना त्यांच्या चेहऱ्यावर जाणवत होती. या उपक्रमाचे संयोजन माऊली सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास दुधाळे, सचिव छाया दुधाळे यांच्यासह वासुदेव गोपाळे, सचिन शिंदे, दिपाली शिंदे, हर्षल शिंदे, वृंदावन महाजन, बाबाजी कातोरे, सविता लोंढे, गौरी दुधाळे यांनी केले. माऊली सेवा प्रतिष्ठानच्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत असून, भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवले जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### नेत्रदान जनजागृती रॅली उत्साहात पार पडली

पुणे (आरंभ पर्व) : दूधभाते नेत्रालय व रेटिना सेंटर आणि सोशल अवेअरनेस कमिटी, नांदेड सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड सिटी परिसरात नेत्रदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. नागरिकांमध्ये नेत्रदानाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि समाजात सकारात्मक संदेश देणे हा या रॅलीचा उद्देश होता. रॅलीदरम्यान "नेत्रदान – श्रेष्ठदान" आणि "दृष्टी द्या, जीवन उजळवा" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. फलक, बॅनर आणि संदेशात्मक पोस्टर्सच्या माध्यमातून नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले. या उपक्रमात हॉस्पिटलचे कर्मचारी, विद्यार्थी, स्वयंसेवक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग घेतला. उपस्थितांना संबोधित करताना दूधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरचे संचालक डॉ. अनिल दूधभाते यांनी देशात आजही लाखो नागरिक दृष्टीहिन असल्याचे सांगितले. नेत्रदानामुळे अशा व्यक्तींना नवजीवन मिळू शकते, मात्र नेत्रदान करणाऱ्यांची संख्या कमी असल्याने समाजात याबाबत व्यापक जनजागृतीची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एका मृत व्यक्तीच्या नेत्रदानामुळे दोन दृष्टीहिन व्यक्तींना दृष्टी मिळू शकते, असेही त्यांनी नमूद केले.







# संतूरने २८५० कोटीं विक्रीचा टप्पा गाठला

## सर्वात मोठा साबण ब्रँड ठरला




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतीय ग्राहकांची सखोल समज आणि 'संतूर मॉम' या लोकप्रिय संकल्पनेच्या आधारावर संतूर ब्रँडने गेल्या चार दशकांपासून भारतीय कुटुंबांसोबत एक मजबूत नाते निर्माण केले आहे

विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंगचा संतूर हा देशातील सर्वात मोठा साबण ब्रँड ठरला आहे. जवळपास चार दशकांच्या प्रवासात संतूरसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

चंदन आणि हळद या खास गुणधर्मांमुळे ओळखला जाणारा संतूर 1985 मध्ये बंगळुरूमध्ये मर्यादित स्वरूपात सुरू झाला. त्यानंतर 1986 मध्ये तो संपूर्ण देशभरात उपलब्ध झाला. गेल्या 12 महिन्यांतील कंपनीच्या विक्रीच्या (INDAS) आकडेवारीनुसार संतूरने वैयक्तिक स्वच्छतेच्या उत्पादनांमध्ये 2,850 कोटी रुपयांची विक्री केली असून भारतातील सर्वात मोठा साबण ब्रँड ठरला आहे.

संतूरने सर्वसामान्य भारतीय महिलांसाठी "तरुण दिसणारी त्वचा" हा सहज समजणारा संदेश दिला. हा संदेश 'संतूर मॉम' या जाहिरातीद्वारे लोकांपर्यंत पोहोचवला गेला, सातत्याने वापरला गेला. परंतु काळानुसार महिलांच्या बदलत्या इच्छा-आकांक्षा आणि त्यांच्या विविध भूमिका दाखवण्यासाठी या संदेशाचे सादरीकरण बदलत गेले, ज्यामुळे ग्राहकांशी संतूरचं नाते अधिक घट्ट झाले. गेल्या अनेक वर्षांत संतूरने आपल्या उत्पादनाची गुणवत्ता आणि पॅकेजिंग सुधारण्यासाठी मेहनत केली आणि संतूरला त्याच्या चमकदार नारिंगी रंगासोबत जोडून एक वेगळी ओळख निर्माण केली. मजबूत कामकाज आणि महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये अव्वल स्थान मिळवण्यावर लक्ष केंद्रित केल्यामुळे संतूरचा हा यशस्वी प्रवास शक्य झाला.

या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना विनीत अग्रवाल, सीईओ, विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंग आणि मॅनेजिंग डायरेक्टर, विप्रो एंटरप्रायझेस म्हणाले," भारतातील सर्वात मोठा साबण ब्रँड होणे हे आमच्यासाठी विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंगमध्ये एक अभिमानाची गोष्ट आहे. संतूरचा प्रवास ग्राहकांना समजून घेणे, नियमीत काम करणे आणि सातत्याने मूल्य निर्माण करणे या विश्वासावर आधारित आहे. ग्राहकांना उत्तम गुणवत्ता देण्यासाठी आम्ही सातत्याने मेहनत घेतली आहे, उत्पादनात सातत्याने सुधारणा केली आहे. मग तो सुगंध असो, उत्कृष्ट अनुभव असो किंवा कठीण पाण्यात कामगिरी असो. यासोबत आकर्षक जाहिरातींनीही ब्रँडच्या यशाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे."

नीरज खत्री, चीफ एक्झिक्युटिव्ह, विप्रो कन्झ्युमर केअर म्हणाले,"हा टप्पा आमच्यासाठी खूप अभिमानाचा आहे. आमच्या कारखान्यांतील टीम, फ्रंटलाईन कर्मचारी आणि विविध भागांतील व्यवसायिक टीम्स यांनी खूप मेहनत घेतली आहे. संतूरला आघाडीवर नेण्याचा त्यांचा ठाम विश्वास, कठोर परिश्रम आणि उच्च गुणवत्ता व कार्यक्षमतेप्रती निष्ठा यामुळे हे यश मिळाले. आमच्या वितरक आणि भागीदारांच्या सातत्यपूर्ण विश्वास आणि सहकार्याबद्दल आम्ही मनापासून आभारी आहोत ज्यांच्या मदतीशिवाय हा प्रवास शक्य झाला नसता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळेच ग्राहकांचा विश्वास आणि बाजारातील नेतृत्व टिकवण्यात मदत झाली आहे."

## एआय अप्लायन्सेन्सच्या भावी टप्प्याचे अनावरण करणार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

सॅमसंग 2026 मध्ये डिवाईस एक्स्पीरिअन्स डिव्हिजनसाठी आपला दृष्टिकोन, तसेच जगातील सर्वात मोठे आयटी व होम अप्लायन्स प्रदर्शन सीईएसमध्ये नवीन एआय-संचालित ग्राहक अनुभव सादर करण्यास सज्ज आहे. सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पर्क म्हणाले, सॅमसंग एआय अप्लायन्सेस आणखी एका महत्त्वपूर्ण टप्प्यापर्यंत पोहोचत आहेत, जे वैविध्यपूर्ण अनुभव देत आहेत, वापरकर्त्यांच्या दैनंदिन जीवनाला अधिक जाणून घेतात आणि दैनंदिन राहणीमान अधिक उत्साहित करतात. जगातील सर्वात मोठे ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स व आयटी प्रदर्शन सीईएस 2026 मध्ये पुढील टप्प्याचे अनावरण करण्यात येईल. आम्ही लास वेगास येथे 4 जानेवारी 2026 रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या द फर्स्ट लुक इव्हेण्टमध्ये टीव्हीच्या मर्यादांना देखील दूर करणार आहोत. सीईएसमध्ये सॅमसंग होम लिव्हिंगमधील अनेक सुधारणांना दाखवेल, ज्यामध्ये एआय-समर्थित कस्टमाइज्ड केअर आणि शक्तिशाली हार्डवेअर-सहाय्यक कार्यक्षमतेचे संयोजन आहे.

## भाजपकडून सचिन दोडके यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वारजे पॉप्युलर नगर शिवणे प्रभागातून भारतीय जनता पार्टीकडून माजी नगरसेवक सचिन शिवाजीराव दोडके यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

उमेदवारी जाहीर होताच त्यांनी वारजे क्षेत्रीय कार्यालयामध्ये अधिकृतरित्या आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

सचिन दोडके हे गेली दोन टर्म पुणे महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून कार्यरत होते. या कालावधीत त्यांनी वारजे व परिसरातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच नागरी सोयी-सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. नागरिकांच्या समस्या थेट समजून घेऊन त्या सोडवण्यावर त्यांनी भर दिला आहे.




उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना सचिन दोडके म्हणाले की, "वारजे व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी मी यापुढेही प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे. प्रभागातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा माझा प्रयत्न राहील. नागरिकांच्या विश्वासावर हा उमेदवारी अर्ज दाखल केला तो टिकवण्याची जबाबदारी मी स्वीकारेल" तसेच आतापर्यंत प्रभागातील जनतेसाठी केलेली विकासकामे आणि नागरिकांची मिळणारी साथ यामुळे आपला विजय निश्चित असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वारजे पॉप्युलर नगर शिवणे मधील ही उमेदवारी राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे.

# काळभैरवनाथाच्या साक्षीने ठरला फैसला

## मालखेडचा एकच नारा – पंचायत समितीसाठी धनराज भाऊ जोरीच!

**मालखेड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

मालखेड गावाच्या राजकारणात आज निर्णायक वळण लागले. गावदैवत काळभैरवनाथ मंदिरात झालेल्या ऐतिहासिक बैठकीत ग्रामस्थांनी एकमुखाने पंचायत समिती सदस्यपदासाठी धनराज भाऊ जोरी यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. "गावाचा विकास, गावाचा स्वाभिमान आणि गावाचा आवाज – धनराज भाऊच!" अशा घोषणांनी मंदिर परिसर दणाणून गेला.



राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढणारे आणि कोणत्याही दबावाला न जुमानणारे नेतृत्व म्हणून धनराज जोरी यांची ओळख आहे. पाणीटंचाई, खराब रस्ते, वीज, आरोग्य सुविधा, शेतकरी व युवकांचे प्रश्न यावर त्यांनी वेळोवेळी ठोस भूमिका घेतली आहे. गावात न लोकांमध्ये राहून काम करणारा नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळेच "बाहेरच्यांना नाही, आमच्यातलाच नेता हवा" अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी मांडली.

या बैठकीत युवकांचा उत्साह विशेष लक्षवेधी होता. "आम्हाला आश्वासनांचा नेता नको, कामाचा नेता हवा" अशी स्पष्ट भावना युवकांनी व्यक्त केली. महिलांनीही विकासकामांत किसन बापू जोरी यांनी दिलेल्या योगदानाची आठवण करून देत त्यांना जाहीर पाठींबा दिला.

काळभैरवनाथाच्या चरणी विकासाचा संकल्प करत ग्रामस्थांनी एकच निर्धार केला —

मालखेड गावातून पंचायत समितीसाठी एकच उमेदवार, तो म्हणजे धनराज भाऊ जोरी!

या एकमुखी निर्णयामुळे परिसरातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असून, आगामी पंचायत समिती निवडणूक अधिकच रंगतदार होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## तृप्ती देसाई यांच्या राजकीय भूमिकेकडे लक्ष; राजकारणात एन्ट्री करणार का?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक आणि धार्मिक हक्कांच्या लढ्यामुळे राज्यभरात ओळख निर्माण करणाऱ्या तृप्ती देसाई यांच्या पुढील भूमिकेकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. भूमाता ब्रिगेडच्या माध्यमातून महिलांच्या हक्कांसाठी आक्रमक आंदोलन करणाऱ्या तृप्ती देसाई या येत्या काळात थेट राजकारणात सक्रिय होणार का, याबाबत चर्चा रंगू लागल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून सामाजिक प्रश्न, महिला सबलीकरण, समान हक्क आणि धार्मिक स्थळांवरील प्रवेश या मुद्द्यांवर तृप्ती देसाई सातत्याने आघाडीवर राहिल्या आहेत. त्यांच्या आंदोलनांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवरही लक्ष वेधले आहे. त्यामुळेच "आंदोलनातून निवडणुकीपर्यंत" असा प्रवास त्या करणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.



सूत्रांच्या माहितीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पार्श्वभूमीवर काही राजकीय पक्षांकडून त्यांच्याशी संपर्क साधण्यात आल्याचीही चर्चा आहे. मात्र, याबाबत तृप्ती देसाई यांनी अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. "माझी लढाई ही सत्तेसाठी नाही, तर हक्कांसाठी आहे," असे त्या यापूर्वी अनेकदा स्पष्ट करत आल्या आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, सामाजिक आंदोलनातून आलेल्या नेतृत्वाला जनतेचा थेट पाठिंबा मिळण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तृप्ती देसाई यांनी जर राजकारणात प्रवेश केला, तर त्या एखाद्या पक्षासाठी 'गेम चेंजर' ठरू शकतात.

# एअरटेल कार्टून नेटवर्क क्लासिक्स लाँच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा प्रदात्यांपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने आज वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या सहकार्याने एअरटेल डिजिटल टीव्हीवर उपलब्ध असलेल्या विशेष मूल्यवर्धित सेवेअंतर्गत "एअरटेल कार्टून नेटवर्क क्लासिक्स" च्या लाँचची घोषणा केली. हे नवीन चॅनेल कार्टून नेटवर्कवरील काही सर्वात आयकॉनिक ॲनिमेटेड फ्रँचायझी एकत्र आणते, ज्यामुळे कालातीत कथा सांगण्याचा आणि संपूर्ण कुटुंबासाठी योग्य मनोरंजनाचा एक समर्पित मंच उपलब्ध होतो.




एअरटेल कार्टून नेटवर्क क्लासिक्स टॉम अँड जेरी, द फ्लिंटस्टोन्स, लूनी ट्यून्स, स्कूबी डू, जॉनी ब्रावो तसेच इतर अनेक कालातीत आवडीचे कार्यक्रम पुन्हा प्रेक्षकांसमोर आणते. या अत्यंत लोकप्रिय आणि कालातीत शो पाहत मोठे झालेल्या प्रेक्षकांसाठी विशेषतः छाननी करून तयार केलेले करण्यात आलेले हे चॅनेल कुटुंबांना नव्या पिढीसमोर ९० आणि २००० च्या दशकातील सांस्कृतिक ओळखीचा भाग बनलेल्या ॲनिमेटेड कथा ओळख करून देण्याची संधी देईल, ज्या आजही तितक्याच प्रभावीपणे प्रेक्षकांशी जोडल्या जात आहेत.

लाँचबाबत प्रतिक्रिया देताना, एअरटेलचे डीटीएच–बिझनेस हेड पुष्पिंदर सिंग गुजराल म्हणाले, "एअरटेल कार्टून नेटवर्क क्लासिक्स आमच्या पोर्टफोलिओमध्ये एक वेगळे आणि खास मनोरंजनाचे स्तर जोडते आणि आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून असलेल्या आयकॉनिक कथा व पात्रांशी पुन्हा जोडण्याची संधी ग्राहकांना देते. हे चॅनेल आमच्या सर्व डीटीएच आणि आयपीटीव्ही ग्राहकांसाठी उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे आणि भविष्यात अशाच प्रकारचे अधिक निवडक अनुभव आमच्या ग्राहकांसाठी घेऊन येण्यास आम्ही उत्सुक आहोत."

दरमहा रुपये 59 किमतीत उपलब्ध असलेले आणि इंग्रजी तसेच हिंदी भाषेत चॅनेल क्रमांक 445 वर प्रसारित होणारे हे जाहिरातमुक्त चॅनेल Xstream व IPTV सारख्या कनेक्टेड सेट-टॉप बॉक्सेससह नॉन-कनेक्टेड HD आणि SD बॉक्सेसवरही उपलब्ध आहे. त्यामुळे कोणत्याही अतिरिक्त उपकरणांची गरज न पडता प्रेक्षकांना अखंड मनोरंजनाचा अनुभव घेता येणार आहे.

या सहकार्याबाबत बोलताना, वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीचे दक्षिण आशियाचे मॅनेजिंग डायरेक्टर अर्जुन नोव्हार म्हणाले, "कार्टून नेटवर्क क्लासिक्स हे अशा पात्रे आणि कथांच्या शाश्वत वारशाचा उत्सव आहे, ज्यांनी पिढ्यान्पिढ्या जगभरातील प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीमध्ये, आजच्या प्रेक्षकांसाठी या कथा सुलभ आणि सुसंगत ठेवण्यावर आमचा भर आहे. एअरटेलसोबतच्या या सहकार्याच्या माध्यमातून, हे आयकॉनिक आवडीचे कार्यक्रम भारतीय स्क्रीनवर एका नव्या आणि सुलभ स्वरूपात सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. यामुळे चाहते त्यांच्या लहानपणीच्या आठवणींशी पुन्हा जोडले जातील, तसेच जागतिक पॉप संस्कृती घडविण्यात मोलाची भूमिका बजावलेल्या मूळ कार्टून्सची ओळख नव्या पिढीला करून देता येईल."

> **ग्राहक आपल्या सेट-टॉप बॉक्सद्वारे, मिस्ड कॉल देऊन तसेच एअरटेल थँक्स ॲपच्या माध्यमातून एअरटेल कार्टून नेटवर्क क्लासिक्स सक्रिय करू शकतात. वापरण्यास सोप्या अशा अनेक पर्यायांमुळे कोणतीही गुंतागुंतीची प्रक्रिया किंवा प्रतीक्षा न करता, काही सेकंदांतच ग्राहक त्यांच्या आवडत्या क्लासिक कार्टून्सचा आनंद घेऊ शकतात.**

वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीसोबतचे हे सहकार्य एअरटेलच्या वाढत्या मूल्यवर्धित मनोरंजन सेवांच्या श्रेणीत भर घालते आणि दर्जेदार, वेगळे तसेच कुटुंबासाठी अनुकूल कंटेंट देण्याबाबतची कंपनीची कटिबद्धता अधोरेखित करते. कार्टून नेटवर्क क्लासिक्स ही विशेष सेवा सादर करून एअरटेल आपले कंटेंट लीडरशिप अधिक मजबूत करत असून, सर्व वयोगटातील प्रेक्षकांशी संवाद आणि गुंतवणूक अधिक सखोल करत आहे.

## नोकरीसाठी मुलाने रचला भयंकर कट

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

तब्बल तीन कोटी रुपयांची विम्याची रक्कम आणि सरकारी नोकरीसाठी मुलाने भयंकर कट रचून वडिलांची हत्या घडवून आणल्याची धक्कादायक घटना तामिळनाडूमधील तिरुवल्लूर जिल्ह्यात घडली आहे. एका व्यक्तीचा झालेला मृत्यू हा सुरुवातीला अपघात वाटला होता. मात्र नंतर हा सुनियोजित हत्येचा प्रकार असल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी या प्रकरणी मृत व्यक्तीच्या मुलासह सहा जणांना अटक केली आहे. विम्याची रक्कम आणि सरकारी नोकरी मिळवण्यासाठी त्यांनी सर्पदंश करवून वडिलांची हत्या केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. ही घटना २२ ऑक्टोबर रोजी तिरुवल्लूरजवळील पोथथुरपेट्टई परिसरात घडली होती. मृत व्यक्तीची ओळख गणेश म्हणून पटली होती. ते एका सरकारी संस्थेमध्ये लॅब असिस्टंट म्हणून कार्यरत होते. रात्रीच्या वेळी झोपलेले असताना गणेशन यांचा रात्री झोपलेले असताना मृत्यू झाला होता.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.